# उपसंहार

## ।। उपसंहार ।।

इ.स.1960 नंतर मराठी साहित्यामध्ये वाड्मयाचे वेगवेगळे प्रवाह निर्माण झालेले आढळतात. हे सर्व वाड्मयीन प्रवाह मानवी जीवनाचे अधिक वास्तव आणि मूलगामी चित्रण करणारे आहेत. त्यामुळे 1960 नंतरच्या साहित्याचा समाजजीवनाशी अतिशय घनिष्ठ संबंध असलेला दिसतो. समाजातील वेगवेगळे स्तर वाड्मयामधून चित्रीत झालेले आढळतात. कादंबरीसारख्या वाड्मयप्रकारामध्ये मानवी जीवनाचे व्यापक चित्रण येवू शकते. समाजजीवनाची वेगवेगळी अंगे कादंब-यांमधून 1960 नंतर व्यक्त झालेली आढळतात. आदिवासी समाज हा समाजाच्या मूळ प्रवाहापासून बाजूला पडलेला असा समाज आहे. 1960 नंतर मात्र मराठी कादंबरीमध्ये या आदिवासी समाजाच्या जीवनाचे चित्रण अल्पप्रमाणात होऊ लागलेले आढळते. या चित्रणामधून आदिवासींच्या व्यथा, वेदना, त्यांची संस्कृती, जीवनपध्दती इत्यादी गोष्टींमधील वेगळेपणा या कादंब-यांमधून प्रकट झालेला दिसतो. हा वेगळेपणा कादंब-यांमधून प्रकट होत असताना या वेगळया आशयातून मानवी जीवनाचे नवे दर्शन वाचकांना होते म्हणूनच आदिवासी जीवनाचे चित्रण करणा-या कादंब-यांचा अभ्यास प्रस्तुत प्रबंधिकेमधून **महानदीच्या तीरावर** आणि **झेलझपाट** या दोन कादंब-यांच्या अनुषंगाने मांडलेला आहे. हा अभ्यास करीत असताना आदिवासी जीवनाचे चित्रण करणा-या इतरही कादंब-यांचा स्थूल अभ्यास केलेला आहे.

**मराठी कादंबरीचे स्वरूप विशेष** या पहिल्या प्रकरणात कादंबरी या विषयी तात्विक चर्चा केली आहे. कादंबरीमध्ये आशय व रूप याबाबतीत विविधता आहे. त्यामुळे कादंबरीची निश्चित व्याख्या करता येत नाही. याचे विवेचन केले आहे. कादंबरीचा विशाल भाषिक अवकाश व आशयामधील विविधतेमुळे कादंबरीमधील घटकांचा स्वतंत्र अभ्यास केला आहे. कथानक हा कादंबरीचा आत्मा होय. कथानक वाचकांची उत्कंठा, जिज्ञासा, कुतूहल जागृत करते हे पाहिले. कथानकाप्रमाणे कादंबरीतील पात्रांच्या स्वभावचित्रणालाही महत्व असते. पात्रांचा विकास होण्यास लेखकाची मते त्यावर लादली जावू नयेत यादृष्टीने स्वभावचित्रणाच्या विविध पध्दती कोणत्या आहेत याचा थोडक्यात आढावा घेतला आहे. कादंबरीतील वातावरण या घटकामुळे त्या त्या काळातील वास्तव प्रकट होत असते. म्हणून वातावरणनिर्मिती कशाप्रकारची असावी हे या प्रकरणात पाहिले. आशयानुरूप वातावरणनिर्मिती होणे आवश्यक असते. कादंबरीकाराने कादंबरी कंटाळवाणी होऊ नये म्हणून कथानिवेदनाच्या अनेक पध्दतींचा आलटून पालटून वापर करणे गरजेचे असते. म्हणून निवेदनाच्या विविध पध्दती कोणत्या आहेत याचे साधार विवेचन केलेले आहे.

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR

कादंबरीकारांवर त्य त्या काळाचा ठसा उमटतो. वेगवेगळया कालखंडात अनेक दृष्टिकोन प्रभावी ठरतात. त्या कालखंडात त्या त्या दृष्टिकोनांनी प्रभावही गाजविलेला दिसतो याचा उल्लेख संक्षेपाने या प्रकरणात केला आहे. कादंब-यांमधून तत्कालीन सामाजिक दृष्टिकोन प्रकट झाले आहेत हेही पाहिले आहे. निसर्गाशी एकरूप झालेल्या जनसमूहांचे विशिष्ट भूप्रदेश निवडून अनेक कादंबरीकारांनी चित्रण केले आहे. ते कादंबरीकार व त्यांच्या प्रादेशिक कादंब-या कोणत्या आहेत याचा या प्रकरणात थोडक्यात आढावा घेतला आहे. आदिवासी जीवनाचे चित्रण करण्या-या कादंब-यांच्या प्रेरणा प्रादेशिक कादंबरीमध्ये अप्रत्यक्षरित्या पाहावयास मिळतात.

**आदिवासी जीवन आणि वाङ्‌मयीन प्रेरणा** हे या प्रबंधिकेचे दुसरे प्रकरण. आदिवासी जीवनाविषयी स्थूल माहिती तसेच हे जीवन चित्रीत करण्यास मिळालेली प्रेरणा व या प्रेरणेमुळे मराठी साहित्यात आदिवासी जीवनाविषयी झालेले लेखन याचा अभ्यास या प्रकरणात केला आहे.

आदिवासी हे नागर संस्कृतीपासून दूर डोंगरात, रानावनात राहतात. ते आपल्या मुलभूत गरजा कशाप्रकारे भागवितात, त्यांचे व्यवसाय, संस्कृती, सणसमारंभ, युवागृहपध्दती, विवाहपध्दती, मंत्रतंत्र व जादूटोणा यावरील त्याचा विश्वास त्यांच्या धार्मिक श्रध्दा, त्यांची आर्थिक स्थिती, स्वभाव, त्यांची जातपंचायत, तसेच नागर संस्कृतीपेक्षा आदिवासींचे वेगळेपण कसे आहे इत्यादी बाबींचा धावता आढावा या प्रकरणात घेतला आहे.

आदिवासी लोकांशी विविध निमित्तांनी नागर लोकांचा संबंध आला. त्यांनी आदिवासींचा अभ्यास करण्यास सुरूवात केली. आदिवासींविषयीचे उल्लेख लिखाणामध्ये केले जाऊ लागले. एकोणिसाव्या शतकात संशोधक, मिशनरी, व्यापारी, सामाजिक व राजकीय तत्ववेत्ते, मानवशास्त्रज्ञ, समाजशास्त्रज्ञ यांचे लक्ष आदिवासींकडे वेधले गेले. त्यांनी आदिमांच्या अभ्यासास सुरूवात केली. याचे थोडक्यात विवेचन प्रस्तुत प्रकरणात केले आहे.

मराठी साहित्यामध्ये कथा, कादंबरी, नाटकं, कविता इ. विविध माध्यमामधून आदिवासी विषयावर लेखन केले जाऊ लागले. समाजसुधारकांनी आदिवासींच्यात सुधारणा होण्यासाठी केलेल्या चळवळी अथवा प्रयत्न, साहित्यसंमेलने,मेळावे या माध्यमातून आदिवासींविषयी चर्चा होऊ लागली. त्याचा परिणाम म्हणून आदिवासींच्या समस्या समजण्यास मदत झाली. त्यामुळे साहित्यिकांना प्रोत्साहन मिळालेले दिसते. ते कसे कसे मिळाले हे पाहाणे प्रबंधिकेच्या विषयानुरूप आवश्यक होते म्हणून याचा अभ्यास दुस-या प्रकरणात केला आहे. प्रबंधिकेच्या विषयानुरूप **महानदीच्या तीरावर** व **झेलझपाट** या कादंब-यांव्यतिरिक्त आदिवासी जीवनाचे चित्रण करणा-या इतर कादंब-यांमध्ये आदिवासी

जीवन कशाप्रकारे रेखाटले आहे हे पाहाणे आवश्यक असल्याने या प्रकरणात अशा कादंब-यांचा उदा. जैत रे जैत पहिली सलामी, इत्यादींचा स्थूलस्वरूपात परामर्श घेतला आहे. यातून असे निदर्शनास आले की आदिवासी जीवनाचे चित्रण करावे हा हेतू डोळयापुढे ठेवून आदिवासी जीवनाचे चित्रण करणा-या कादंब-या मराठी साहित्यात विशेष लिहिल्या गेलेल्या दिसत नाहीत.

**महानदीच्या तीरावर कादंबरीचे विशेष** या तिस-या प्रकरणात दुर्गा भागवत यांनी फूलिया या गोंड स्त्रीच्या जीवनातील गूढता अद्‌भुतता चित्रीत केली आहे. हे चित्रण करताना फूलिया व जंगो यांच्या कुटुंबाचे स्वरूप दाखविले आहे. फूलियाच्या सासरी कुटुंबाची जबाबदारी सांभाळणारा तिचा दीर भीमा, तिचा ऐतखाऊ पती जंगो, तिची जाव बेला व तिच्या तीन मुली, फूलियाचा मुलगा सिंगा अशी माणसे आहेत. एकटा भीमाच कुटुंबामध्ये कमविणारा आहे तर जंगो काही काम न करता नुसता बासरी वाजविण्यात आपला पूर्ण वेळ घालवितो. या गोष्टी पाहिल्या आहेत.

दारिद्रयावस्थेत जीवन जगणा-या गोंडांच्या मुलभूत गरजाही कशा भागत नाहीत, गोटुल व जोडीदार मिळविण्याची त्यांची पध्दत, अंधश्रध्दा, रूढी परंपरांमधून गोंडांचे अद्‌भुत व गूढ जीवन, त्यांचा मृतात्म्यावरील विश्वास व त्यामुळे दैवाधीन बनलेली त्यांची मने, जमातीतील जातपंचायतीच्या निर्णयाचे महत्व इत्यादी गोष्टी लेखिकेने कशा चित्रीत केल्या आहेत ते पाहिले. गोंडांच्या अंधश्रध्देमधून त्यांचे अज्ञान लक्षात येते. याबरोबरच गोंड जीवनाचे नागर संस्कृतीपेक्षा असलेले वेगळेपण या प्रकरणात पाहिले आहे.

गोंडांची अंधश्रध्दा, त्यांचा मृतात्म्यावरील विश्वास, त्यांची दैवाधीन बनलेली मने चित्रीत करण्यास दुर्गा भागवतांनी आशयानुरूप पात्रेही चित्रीत केली आहेत. उदा. कृतज्ञ, सहनशील, उदार मनाची, अबोल, पतीशी एकनिष्ठ राहणारी परंतु दिसावयास कुरूप, ओबडधोबड व मजबूत बांध्याची फूलिया तर मत्सरी, मुत्सद्दी, धूर्त, सूडबुध्दीची परंतु दिसावयास देखणी अशी बेला, स्वार्थी, अहंकारी, श्रध्दाळू, भावूक, ऐतखाऊ जंगो तर शांत, प्रेमळ, धीर, गंभीर, कष्टाळू असा भीमा इत्यादी पात्रांचे चित्रण कादंबरीत कसे केले आहे हे या प्रकरणात पाहिले आहे. या पात्रांचे चित्रणातून आदिवासी जमातीतील लोक हे देखील मानवच होत. त्यामुळे त्यांच्या भावभावना, वृत्तीप्रवृत्ती इतर मानवांप्रमाणेच आहेत. ही पात्रे आदिवासींच्या रूढी, परंपरांना अनुसरून कसे वर्तन करतात याचाही अभ्यास या प्रकरणात केला आहे.

गोंड जमातीमधील स्त्री-पुरूष संबंधामध्ये नागर संस्कृतीपेक्षा काही वेगळेपणा आहे का ? यादृष्टीने गोंडांच्या स्त्री-पुरूष संबंधांचाही परामर्श घेतला आहे. गोंड स्त्री-पुरूषांचे एकमेकांशी संबंध

खोळीमेळीचे असतात. विवाहापूर्वी गोंड युवक-युवतींना एकमेकांशी संबंध ठेवण्याचे पूर्ण स्वातंत्र्य असते. गोंडांचे स्त्री-पुरूष संबंध मुक्त स्वरूपाचे असतात हे प्रस्तुत प्रकरणात पाहिले आहे.

गोंड जमातीतील रूढी, परंपरा, चेटूक व भूतबाधा यावरील विश्वास, मृतात्म्यावरील विश्वासाने दैवाधीन बनलेली मने यांचे चित्रण करीत असताना लेखिकेने कादंबरीत अद्भुत, गूढ वातावरणनिर्मिती कशी केली आहे ते या प्रकरणात पाहिले. तसेच निसर्गाचे चित्रण आशयानुरूप कसे केले आहे याचाही अभ्यास केला आहे.

कल्पकता, रंजकप्रधानता, अद्भुतता, अतिशयोक्ती ही दंतकथेची वैशिष्टये या कादंबरीत आलेली आहेत. या कादंबरीचे कथानक लेखिकेने अगोदर ठरवून लिहिलेले दिसते त्यामुळे ती वास्तवापासून दूर कशी गेली याचेही विवेचन या प्रकरणांत केले आहे.

**झेलझपाट कादंबरीचे विशेष** या चौथ्या प्रकरणात मधुकर वाकोडे यांनी झेलझपाट या कादंबरीत फुलय व केरू यांच्या प्रेमकथेच्या चित्रणाबरोबर कोरकू या आदिवासी जीवनाचे यथार्थ चित्रण कसे केले आहे याचा परामर्श घेतला आहे.

कादंबरीची नायिका फुलय व नायक केरू यांच्या कुटुंबाचे स्वरूप लेखकाने कसे चित्रीत केले आहे ते पाहिले. फुलयचे वडील मोपा दारूडे असल्याने कुटुंबाची सर्व जबाबदारी ती एकटीच सांभाळते. तिच्या कुटुंबात ती व तिचे वडील एवढी माणसे आहेत. केरूचे कुटुंबात त्याचे वडील तुमला पटेल, त्याची आई व दोन भावंडे आहेत. आईवडील कमावित असल्याने कुटुंबाची आर्थिक स्थिती बरी आहे. तो स्वतः मॅट्रिकपर्यंत शिकलेला असून त्याची भावंडेही शिक्षण घेत आहेत हे पाहिले. कोरकूंची आपल्या प्राथमिक गरजा भागतील अशी परिस्थिती नसते. त्यातच दारू व लालपरीसारखे व्यसन त्यांच्या दारिद्रयात कसे भर घालीत असते. दारिद्रय हा त्यांच्या जीवनाचा एक भागच कसा बनलेला असतो हे या प्रकरणात पाहिले आहे. मासे पकडण्याचा कोरकूंचा स्वभाव मिळणा-या मजुरीकडे दुर्लक्ष करतो. तसेच दारिद्रयावस्थेत जीवन जगत असतानाही कोरकूंची रूढी-परंपरांची जपणूक, मंत्रतंत्र, नवससायास, भगत यावरील त्यांचा विश्वास, त्यांची अंधश्रध्दा या गोष्टींचा या प्रकरणात परामर्श घेतला आहे. कोरकू होळी हा सण साजरा करण्यास घरातील वस्तुही विकतात, रात्रभर नाचतात, फाग मागतात, शिकार करतात. त्यांचे हे वैशिष्टयपूर्ण जीवन या प्रकरणात पाहिले आहे. लांबजाना होणे, घरात घुसणे तसेच मुलीला हुंडा देणे या अनेक विवाहपध्दतीमधून कोरकूंचा जोर्डदार मिळविण्यासंबंधीचा नागर संस्कृतीपेक्षा असलेला वेगळेपणा कादंबरीत व्यक्त झाला आहे. यसंबंधीचे विवेचन प्रस्तुत प्रकरणात केले आहे. कोरकू जमातीत

SHIVAJI UNIVER

जातपंचायतीच्या निर्णयास महत्व असते. पंचायतीने दिलेल्या निर्णयांचे, नियमांचे उल्लंघन केल्यास कठोर शासन केले जाते. अशाप्रकारची कोरकूंची जातपंचायत व न्यायव्यवस्था याचाही आढावा प्रस्तुत प्रकरणात घेतला आहे. तसेच नागर लोक कोरकूंच्या अज्ञानाचा, भोळया स्वभावाचा फायदा घेवून त्यांची लुबाडणूक, फसवणूक करीत आहेत व आपण फसविले जातो आहोत हे कोरकूंना कळतही नाही. लुबाडले जाणे, फसविले जाणे हा त्यांच्या जीवनाचा एक भाग बनलेला दिसतो याचाही परामर्श प्रस्तुत प्रकरणात घेतला आहे.

कोरकूंमध्ये सुधारणा व्हाव्यात यादृष्टीने टायगर प्रोजेक्ट, संकरित गाईंचे उत्पादन करण्यास माहिती देणे, अंगणवाडी (शाळा) यासारख्या योजना सरकार राबवित आहे. परंतु कोरकूंच्या अज्ञानामुळे कोरकूंकडून म्हणावा तितका प्रतिसाद मिळत नाही. कोरकूंना शिक्षण दिले गेले पाहिजे ही लेखकाने मांडलेली समस्या या प्रकरणात पाहिली आहे.

केरू व फुलय या कोरकू प्रेमीयुगुलाची हळुवार प्रेमकहाणी वाकोडे यांनी सांगितलेली आहे. त्याबरोबर कोरकू समाजाचे दर्शनही घडविलेले आहे. यासाठी केरू, फुलय, मालाय, रहिमशेठ, कासम मण्यारीवाला, अंगणवाडीच्या बाई, डॉ. टिकेकर इ. व्यक्तीरेखांचे वैभव त्यांच्या वैशिष्टयपूर्ण स्वभावासह, वृत्तींसह चित्रीत केले आहेत. या व्यक्तीरेखाही या प्रकरणात पाहिल्या आहेत. कोरकूंचे अज्ञान, सद्यकालीन विसंवादी भ्रष्टाचारी जीवनपध्दतीचे अंत:प्रवाह, कोरकू स्त्री-पुरूषांचे खोळीमेळीचे, सलोख्याचे, निष्पाप व निरागस संबंध चित्रीत करण्यासाठी लेखकाने वास्तववादी पैलू विशेष कौशल्याने रेखाटले आहेत. याचा या प्रकरणात अभ्यास केला आहे.

मधुकर वाकोडे कोरकू समाजाचे दर्शन घडविताना त्यांच्या वस्तीचे, आसपासच्या परिसराचे, त्यांच्या दारिद्रयाचे, त्यांच्या अंधश्रध्दा, रूढी, परंपरांचे, मंत्रतंत्रावरील विश्वासाचे, त्यांच्या सणसमारंभाचे, त्यांच्या शिकारी वृत्तीचे, मासेमारीचे, नागर लोकांकडून होणा-या शोषणाचे, केरू व फुलय यांच्या प्रेमाचे, फुलयच्या आत्महत्येचे चित्रण करतात. यासाठी परिणामकारक आशयानुरूप वातावरणनिर्मिती करतात हे या प्रकरणात पाहिले आहे. यासाठी वाकोडे यांनी विरोध व लय, तौलनिक पध्दती इ. पध्दतींचा वापर करून कादंबरीमध्ये लालित्य निर्माण केले आहे. याचे साधार विवेचन प्रस्तुत प्रकरणात केले आहे.

निसर्गामध्ये जीवन जगणा-या कोरकूंचे-आदिवासींचे-जीवन निसर्गाशी निगडीत असते. निसर्ग तेथील माणसांच्या जीवनाचा अविभाज्य भाग बनलेला असतो. त्यामुळे कादंबरीतील निसर्गाचे चित्रण आदिवासींच्या जीवनाचा आवश्यक भाग म्हणूनच आलेले दिसते. त्याबरोबरच वाकोडे यांनी

निसर्गसौंदर्याचे दर्शनही घडविले आहे. उपमा, उत्प्रेक्षा हे अलंकार, वाक्प्रचार व म्हणी, निसर्गातील प्रतिमा व प्रतिके यांच्या माध्यमातून लेखकाने कोरकूंचे केलेले चित्रणही या प्रकरणात पाहिले आहे. समीक्षकांची म्ते व आपण घेतलेल्या कांदबरीच्या परामर्शावरून वाकोडे यांची ही कादंबरी आदिवासी जीवनाचे सर्वंकष चित्रण करण्यात यशस्वी झाली आहे हे या प्रकरणात पाहिले आहे.

पाचवे प्रकरण **महानदीच्या तीरावर व झेलझपाट या दोन कादंब-यातील भाषा व निवेदनपध्दती** यावर प्रकाश टाकणारे आहे. प्रस्तुत प्रकरणात कादंबरीची भाषा व निवेदनपध्दती याविषयी तात्विक चर्चा केलेली आहे. भाषा हे वाङ्मयीन कलाकृतीचे माध्यम असते. कादंबरीमध्ये आशयाप्रमाणेच तो आशय ज्या भाषेद्वारे, भाषाशैलीने, रीतीने व्यक्त केलेला असतो त्यालाही महत्व असते. साहित्यकृतीतील जीवनाशयाची प्रचिती भाषेच्या माध्यमातून येते. लेखनशैलीतून लेखकाचे व्यक्तित्व, स्वभाव, सौंदर्यासक्ती, भोवतालच्या जीवनाबद्दल वाटणारी उत्सुकता, जीवनदृष्टी इ.चे दर्शन घडते. लेखक आशयापुरूप वातावरणाशी निगडीत भाषा वापरतात हे पाहिले आहे.

कादंबरीमध्ये आशय, भाषा, यांच्या इतकेच तो आशय कसा, कोणत्या पध्दतीने अभिव्यक्त निवेदीत केला यालाही महत्व असते. आशय व अभिव्यक्ती यांचा निकटचा संबंध असतो. लेखक निवेदनातून पात्रासंबंधी वातावरणासंबंधी काही व्यक्त करीत असतो. यांतून लेखकाची त्या जीवनाकडे पाहण्याची दृष्टी कळते. हे निवेदन लेखक प्रत्यक्षाप्रत्यक्ष तर कधी सूचकपणे करतो. निवेदनातून लेखक जीवनविषयी भाष्यही करतो. कोणत्याही कादंबरीच्या आकलन मूल्यमापनासाठी निवेदन व भाषा यांचा विचार करणे महत्वाचे ठरते. याचेही साधार विवेचन या प्रकरणात केले आहे.

दुर्गा भागवत यांनी **महानदीच्या तीरावर** या कादंबरीमध्ये गोंडांच्या अंधश्रध्दा त्यांचा मृतात्म्यावरील विश्वास व त्यामुळे दैवाधीन बनलेली त्यांची मने यांचे चित्रण करताना नागर भाषेचा वापर केलेला आहे. तर वाकोडे यांनी **झेलझपाट** या कादंबरीमध्ये केरू व फुलय यांची प्रेमकहाणी फुलवित असताना कोरकू समाजाचे दर्शन कादंबरीत घडविले आहे. यासाठी कादंबरीमध्ये नागर भाषा व आदिवासी (कोरकू) भाषा वापरलेली आहे हे या प्रकरणात पाहिले आहे.

दुर्गा भागवत यांनी **महानदीच्या तीरावर** या कादंबरीमध्ये पात्रांची भाषा नागर पध्दतीची वापरली आहे. पात्रांची भाषा नागरवळणाची पण आदिवासी बोलीचा काही एक प्रमाणात प्रभाव असलेली अशी असती तर कादंबरीतील आशयाला ती भाषा अनुरूप वाटावी अशा प्रकारची झाली असती. पण अशी भाषा लेखिकेने वापरलेली नाही. त्यांच्या कादंबरीचा चित्रणविषय आदिवासी जीवन हा आहे. या आशयास अनुरूप अशी भाषा वाटत नाही. त्यामुळे कादंबरीतील व्यक्तीरेखा त्या वातावरणातील वाटत नाहीत. तर मधुकर वाकोडे यांनी **झेलझपाट** या कादंबरीमध्ये पात्रानुरूप त्या त्या

पात्राची भाषा वापरलेली आहे. आदिवासी पात्रांची भाषा प्रसंगानुरूप आदिवासी पध्दतीचीच वापरली आहे. आदिवासी भाषा दुर्बोध असते. परंतु वाकोडे यांच्या या कादंबरीतील आदिवासी भाषा समजते, कारण आदिवासी भाषेतील वाक्यांशांचा अर्थ त्यांनी त्या त्या वाक्यापुढे नागर भाषेतून सहजगत्या दिलेला आहे. स्त्री-पात्रांचे व पुरूषपात्रांचे चित्रण करताना लेखकाची भाषा बदललेली दिसते. यथार्थ भाषेमध्ये त्या त्या व्यक्तीरेखांचे चित्रण केल्याने ती पात्रे त्या त्या वातावरणातील वाटतात. भाषेमध्ये विरोध व लय, अलंकार, वाक्प्रचारांचा वापर करून कादंबरीतील घटना, प्रसंगांचे, पात्रांचे यथार्थ भाषेत कसे चित्रण केले आहे याचे सोदाहरण विवेचन प्रस्तुत प्रकरणात केले आहे.

दुर्गा भागवत यांनी **महानदीच्या तीरावर** या कादंबरीतील पात्रांची भाषा जशी नागर पध्दतीची वापरली आहे. तद्वतच निवेदनाची भाषासुध्दा नागर पध्दतीचीच वापरलेली आहे. कादंबरीमध्ये वातावरणनिर्मिती नागर भाषेतूनच केलेली आहे. निवेदनामध्ये जीवनाविषयी भाष्य करणारी वाक्ये वापरलेली आहेत. आदिवासी जीवनाची केवळ पार्श्वभूमी स्वीकारून दुर्गा भागवत केवळ नागर जीवनाचेच चित्रण करतात असे कादंबरी वाचतांना वाटत राहाते. आशयानुरूप वातावरणनिर्मिती नसल्याने ही कादंबरी वास्तवापासून दूर जाते हे या प्रकरणात पाहिले आहे. मधुकर वाकोडे यांनी **झेलझपाट** या कादंबरीमध्ये कोरकू जीवनाचे, त्यांच्या दारिद्र्याचे, अज्ञानाचे, त्यांच्या स्वभावाचे, त्यांच्या अंधश्रध्दा, रूढी, परंपरांचे, सणसमारंभाचे, त्यांच्या शिकारी वृत्तीचे, मासेमारीचे, नागर लोकांकडून होणा-या कोरकूंच्या शोषणाचे, फसवणूकीचे यथार्थ शब्दांमध्ये, आशयसमृध्द शैलीमध्ये निवेदन केले आहे. कोरकू समाजाच्या जीवनदर्शनाबरोबरच लेखकाने केरू व फुलय या कोरकू प्रेमीयुगुलाची प्रेमाची हळुवार कहाणीही निवेदीत केली आहे. निवेदनातून लेखकाची भ्रष्टाचारविरोधी भूमिका प्रकट होते. आदिवासींबद्दल त्यांना वाटत असलेली तळमळ, सहानुभूती, त्यांच्यात सुधारणा झाल्या पाहिजेत म्हणून त्यांना वाटणारी काळजी इत्यादी गोष्टींचे प्रकटीकरण त्यांच्या निवेदनातून होते. त्यातून वाकोडे यांचा मूल्यसापेक्ष जीवनविषयक दृष्टिकोनही प्रकट होतो. हे या प्रकरणात पाहिले आहे. निवेदनातून लेखकाने टायगर प्रोजेक्ट यासारख्या योजनांमुळे आदिवासींपुढे निर्माण झालेली समस्या व शिक्षणाचे माध्यम कोरकू बोली नसल्याने शिक्षणाविषयी कोरकूंना वाटणारी नावड असे आदिवासींना भेडसावणारे प्रश्नही वाचकांपुढे निदर्शनास आणले आहेत. शासनयंत्रणेपासून ते व्यापा-यांपर्यंत नव्हे समाजामध्ये सर्वठिकाणी चाललेल्या भ्रष्टाचाराचे दर्शनही निवेदनातून घडविले आहे. टायगर प्रोजेक्ट, संकरित गाईची कोरकूंना माहिती देण्याची योजना इत्यादी योजनांमुळे आदिवासींमध्ये कशी सुधारणा होत गेलेली आहे हे लेखकाने दिग्दर्शित केले आहे. त्याचबरोबर धर्मांतरासारख्या गोष्टींमुळे आदिवासींची संस्कृती,

SHIVAJI UNIVERSITY KOLHAPUR

त्यांचे मुक्त जगणे यातील स्वाभाविकता कशी लयाला चालली आहे याचेही चित्रण करण्यास मधुकर वाकोडे विसरत नाहीत. थोडक्यात आपल्या निवेदनातून वाकोडे मूल्यसापेक्ष दृष्टिकोन व्यक्त करतात. अशी कोणतीही भूमिका दुर्गा भागवत मात्र घेताना आढळत नाहीत. अशाप्रकारचे निरीक्षण प्रबंधिकेच्या पाचव्या प्रकरणात नोंदविलेले आहे.

वरील पाच प्रकरणांचा आढावा प्रस्तुत प्रबंधिकेच्या उपसंहारामध्ये घेतला आहे. तसेच सारांशरूपाने या अभ्यासाचे निष्कर्षही मांडलेले आहेत.

*****************